# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ९५ वा शनिवार दि.१४ सप्टेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# कु. साक्षी लगाडे कायद्याचे उच्च शिक्षणासाठी लंडन ला रवाना






नवी मुंबई / के. एच. हनवते :– रिपब्लिकन सेना नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : वीरेंद्र लगाडे यांची कन्या कुमारी : साक्षी लगाडे ही कायद्याच्या उच्च शिक्षणासाठी लंडन या ठिकाणी दिनांक : १३ सप्टेंबर २०२४ रोजी जात आसल्याने एक छोटसं स्नेहसंमेलनाचे आयोजन नवरत्न अपार्टमेंट सेक्टर – ६ नेरूळ नवी मुंबई या ठिकाणी दिनांक : ११ सप्टेंबर २०२४ रोजी घेण्यात आले व तिच्या भावी कार्यास उपस्थित मान्यवरांनी मंगलमय हार्दिक शुभेच्छा देऊन आनंद व्यक्त केला. त्यावेळी नवी मुंबईतील विविध पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. आरपीआय चे आयु. महेश खरे, प्रा. वानखेडे सर, प्रा. डॉ. बळीराम गायकवाड, समाजसेवक : दिलीप आमले, माजी नगरसेवक : सुरज पाटील, समाजसेवक : विजय साळे, प्रकाश पवार, अण्णा त्रिभुवन, कैलाश सरकटे, बबन इंगळे, कोंडीबा हिंगोले, पत्रकार कल्याणराव हनवते, रिपब्लिकन सेनेचे: प्रज्ञेश कांबळे, रेखाताई इंगळे, दिपा बम, प्रभावती हिंगोले, पद्मिनीताई रणदिवे, खरात ताई आणि नवरत्न अपार्टमेंटचे स्थानिक रहीवाशी अरविंद शिरपूरकर, राजकुमार मेहते आणि स्थानिक लहान थोर बालक बालिका यांनी कार्यक्रमस्थळी उपस्थित राहून कुमारी : साक्षी लगाडे यांना पुढील कार्यास मंगलमय हार्दिक शुभेच्छा व मनसोक्त गौरव करून मनोबल वाढवले.

## ग्रामीण तरुणांना नोकरी देण्याबरोबरच उद्योजक व्यावसायिक बनवण्यासाठी अभिनव उपक्रम ट्वेंटीवन शुगर च्या रोजगार मेळाव्यास उस्फुर्त प्रतिसाद



लातूर /प्रतिनिधी :– लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात, शेतकरी आणि शेतमजूर यांच्या मुलांच्या हातांना काम मिळवून देऊन ही कुटुंबे आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी, मांजरा परिवारातील साखर कारखाने व बँकांनी पुढाकार घ्यावा असा सूचना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दिल्या असून, या उपक्रमाचाच एक भाग म्हणून १२ सप्टेंबर रोजी ट्वेंटीवन शुगर युनिट १ च्या वतीने आयोजित रोजगार मेळाव्यास तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, या तरुणांना प्रशिक्षणासह, आर्थिक व इतर सर्व प्रकारची मदत करून उद्योजक व व्यावसायिक बनवण्याचा प्रयत्न होणार आहे. शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नसल्याने सध्या ग्रामीण भागात सुशिक्षित तरुणांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे, या तरुणांच्या हाताला काम मिळवून देण्यासाठी त्यांना शेतीपूरक उद्योग, व्यवसायात मदत करण्याचा निर्धार मांजरा परिवाराच्या वतीने करण्यात आला आहे, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या सूचनेवरून १२ सप्टेंबर२०२४ रोजी ट्वेंटीवन शुगर युनिट १ च्या वतीने, कारखाना साईट मळवटी येथे, या तरुणांसाठी रोजगार मेळावा घेण्यात आला, मिळाल्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, हजारोच्या संख्येने या ठिकाणी युवकांनी आपली नोंदणी केली. ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुणांच्या माध्यमातून शेती व्यवसायात यांत्रिकीकरण आणून हा व्यवसाय फायद्याचा ठरावा हा उद्देस माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांचा असून, त्या दृष्टीने शेती अवजारे,ऊस तोडणी यंत्र तसेच मालवाहतूक करणाऱ्या वाहनांशी संबंधित कंपन्यांचे प्रतिनिधी आणि विविध बँका व फायनान्स कंपन्यांचे प्रतिनिधी या मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित ठेवण्यात आले होते, ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रक ट्रॅक्टर, ट्रॉली खरेदी करण्याची तयारी दर्शवणाऱ्या तरुणांनी २५% अनामत रक्कम भरल्या नंतर उर्वरित ७५ टक्के कर्जाची हमी घेण्याची तयारी ट्वेंटीवन शुगर च्या वतीने घेण्यात आली. विविध प्रकारची वाहन चालवणेचे प्रशिक्षण घेतलेले युवक, ऊस तोडणी यंत्रावर काम करण्याची तयारी असलेली युवक, वाहन व इतर मशिनरीची दुरुस्ती करण्याची तयारी असलेल्या युवकांची नोंदणी करून त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे हमी या ठिकाणी देण्यात आली, शेतीसाठी लागणारी इतर अवजारे खरेदी करून त्याचा व्यवसाय करणाऱ्यांसाठीही, ट्वेंटीवन शुगर व बँकांच्या वतीने हमी देण्याची तयारी यावेळी दर्शवण्यात आली, त्यामुळे या हा रोजगार मेळावा, अनेक तरुणांच्या हाताला तातडीने काम देणारा तर ठरलाच शिवाय अनेक तरुणांना उद्योजक आणि व्यावसायिक बनणारा ठरला आहे, ट्वेंटीवन शुगर युनिट क्रमांक १, मळवटी च्या वतीने आयोजित या रोजगार मेळाव्यास लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, विलास को–ऑपरेटिव बँक तसेच आयसीआयसीआय, एचडीएफसी, सुंदरम, महिंद्रा, एचडीबी, चोलामंडलम, एयुइंडसन, एलअँडटी, व इतर खाजगी फायनान्स कंपन्यांचे प्रतिनिधी, महिंद्रा, स्वराज, हिंदुस्तान, मॅसी, फरगुशन, जॉन डियर ,कुबोटा इत्यादी वाहन कंपन्यांचे प्रतिनिधी त्यांच्या वेगवेगळ्या वाहनांसह या मेळाव्यास उपस्थित होते, शिवशक्ती लक्ष्मण, श्रद्धा, नृसिंह, हिंदुस्तान, लक्ष्मी इत्यादी ट्रॉली व जाळी बनवणाऱ्या कंपन्यांचे प्रतिनिधी ही आपल्या उत्पादन वैशिष्ट्यसह येथे उपस्थित होते, ज्यांना नोकरी पाहिजे त्यांना नोकरी आणि ज्यांना उद्योग व्यवसायिक बनायचे आहे त्यांच्यासाठी कर्जाची हमी या ठिकाणी देण्याचा प्रयत्न झाला त्यामुळे हा रोजगार मिळावा अत्यंत यशस्वी ठरला आहे.




# राष्ट्रवादीचा लातूर जिल्हाध्यक्ष बदलण्याची पक्षनेतृत्वाकडे मागणी : रघुनाथ कुचेकर




लातूर : राष्ट्रवादी काँग्रेस – शरदचंद्र पवार पक्षाचे लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष संजय शेटे हे पक्ष नेतृत्वाने सुचविलेल्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून आपल्या मर्जीतील कार्यकर्त्यांना पदे देऊन जिल्ह्यात पक्षाचे अतोनात नुकसान करत असल्याबद्दल शेटे यांना जिल्हाध्यक्षपदावरून तात्काळ हटविण्यात यावे अशी मागणी पक्षाचे संस्थापक अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्याकडे केल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष रघुनाथ कुचेकर यांनी शुक्रवारी लातुरात पत्रकारांशी बोलताना दिली. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस रवींद्र पवार यांनी दि. १५ एप्रिल २०२४ रोजीच्या पत्रान्वये लातूर जिल्ह्यातील तालुकाध्यक्ष, कार्याध्यक्ष, शहराध्यक्ष व विधानसभा अध्यक्ष यांच्या नियुक्त्या प्रदेशाध्यक्ष आ. जयंतराव पाटील यांच्या मान्यतेने करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्या पत्रात कोणत्या तालुक्यातून कोणाला अध्यक्ष – शहराध्यक्ष – कार्याध्यक्ष अशी पदे द्यावयाची आहेत, त्यांच्या नावाची यादीच जिल्हाध्यक्षांकडे सुपूर्द केली होती. या यादीप्रमाणे नियुक्त्या करून त्याचा संपूर्ण अहवाल प्रदेश कार्यालयास पाठविण्याबाबत सूचित करण्यात आले होते. संजय शेटे यांनी प्रदेश पदाधिकाऱ्यांनी सांगितलेल्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना पदे न देता आपल्या मर्जीतील कार्यकर्त्यांची वर्णी त्या पदावर मनमानीपणे केली असल्याचे रघुनाथ कुचेकर यांनी सांगितले. आम्ही सगळे शरदचंद्र पवार यांचे एकनिष्ठ कार्यकर्ते आहोत. त्यामुळे ऐन विधानसभा निवडणुकीच्या काळात जिल्ह्यात पक्षाचे नुकसान होता कामा नये, याकरिता जिल्हाध्यक्ष संजय शेटे यांना पदावरून हटविण्याची मागणी करत आहोत. ही मागणी आपण पक्षाध्यक्ष शरदचंद्र पवार, सुप्रियाताईल सुळे, प्रदेशाध्यक्ष आ. जयंतराव पाटील यांच्याकडेही शिष्टमंडळाने जाऊन करणार आहोत. लातूर ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष संजय शेटे पक्षनेतृत्वाला चुकीची माहिती देऊन निष्ठावंतांना डावलून कामे न करणाऱ्यांना सोबत घेऊन चालत असल्याचा आरोपही यावेळी कुचेकर यांनी केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण कांबळे यांनी यावेळी बोलताना वरिष्ठांच्या पत्राला केराची टोपली दाखविण्याचे काम जिल्हाध्यक्ष संजय शेटे यांनी केले असून त्यांना पदावरून हटवून त्यांच्या जागेवर पक्षाचा सन्मान करणाऱ्या व्यक्तीला जिल्हाध्यक्षपदी विराजमान करण्याची मागणी केली. जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकूण २९ सेल कार्यरत असून त्यापैकी आतापर्यंत एकाही सेलची बैठक झाली नाही. पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने जिल्हाध्यक्षांना सूचनेप्रमाणे नियुक्त्या करून अहवाल प्रदेश कार्यालयास पाठविण्यास सांगितले होते. मात्र आतापर्यंत लातूर जिल्ह्याचा अहवालच प्रदेशाकडे पाठविण्यात आला नसल्याचे त्यांनी सांगितले. पक्षाध्यक्ष शरदचंद्र पवार, खा. सुप्रियाताई सुळे, प्रदेशाध्यक्ष आ. जयंतराव पाटील आम्हा सर्व निष्ठावंत कार्यकर्त्यांची मागणी मान्य करतील असा विश्वासही कांबळे यांनी व्यक्त केला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष शाहू – फुले – आंबेडकरांच्या विचारसरणीप्रमाणे चालणारा पक्ष आहे. पण पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी कार्यरत असणाऱ्या नेत्यांकडूनच पक्षाच्या ध्येय धोरणांची पायमल्ली होत असेल तर शरदचंद्र पवार यांचे निष्ठावंत असणारे आम्ही सर्व कार्यकर्ते शांत बसणार नाहीत. जिल्हाध्यक्षांच्या कार्यपद्धतीवर आम्ही नाराज असलो तरी एकही कार्यकर्ता राष्ट्रवादी काँग्रेस सोडणार नाही,असेही त्यांनी निक्षून सांगितले. यावेळी नरेंद्र पाटील, अॅड. विनायक शिंदे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे ग्रामीण जिल्हा कार्याध्यक्ष अॅड. सुरज साळुंके, मनोज कातळे, डॉ. बापूसाहेब पाटील, प्रमोद जाधव, व्यंकटराव रणखांब, रुपेश चक्रे, धनंजय चव्हाण, जयप्रकाश उजळंबे, राजेश मुगळे, महेश चव्हाण, शाहेद चाऊस आदींची प्रमुख उपस्थिती होती. यांच्यासह अनेक कार्यकर्ते – पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या महाराष्ट्र भूषण पुरस्कारांचे १७ सप्टेंबर रोजी मान्यवरांच्या हस्ते वितरण




लातूर :– मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई जिल्हा शाखा लातूर आयोजित महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळा–२०२४ येथील दयानंद सभागृहात मंगळवार, दि. १७ सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० वा. आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती लातूर जिल्हा पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अशोक देडे, जिल्हा सचिव अशोक हनवते यांनी दिली. पंढरपूर देवस्थानचे कार्याध्यक्ष ह. भ.प.गहिनीनाथ महाराज यांच्या शुभहस्ते व पत्रकार संघाचे संस्थापक संजय भोकरे यांच्या अध्यक्षस्थानी हा सोहळा पार पडणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री दिलीपराव देशमुख, आ. अमित देशमुख, खा. डॉ. शिवाजी काळगे, आ. रमेशआप्पा कराड, पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे ( दिल्ली), प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे, पोलीस अधिक्षक सोमय मुंडे, मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे, पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ.विश्वास आरोटे, मराठवाडा अध्यक्ष वैभव स्वामी उपस्थित राहणार आहेत.

सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल बाबा आमटे महाराष्ट्र भूषण पुरस्कार, शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल कर्मवीर भाऊराव पाटील महाराष्ट्र भूषण पुरस्कार, राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र भूषण पुरस्कार, क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल खाशाबा जाधव महाराष्ट्र भूषण पुरस्कार, पत्रकारितेमधील उल्लेखने कार्य केल्याबद्दल बाळशास्त्री जांभेकर महाराष्ट्र भूषण पुरस्कार, महिलांमध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सावित्रीबाई फुले महाराष्ट्र भूषण पुरस्कार, उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र भूषण पुरस्कार, प्रशासकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र भूषण पुरस्कार, वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र भूषण पुरस्कार, सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सहकार महर्षी महाराष्ट्र भूषण पुरस्कार मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात येणार आहे. स्मृतिचिन्ह, गौरवपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष अफसर कारभारी, जिल्हा संघटक सुधाकर फुले, शहर जिल्हाध्यक्ष महादेव डोंबे, इले. जिल्हाप्रमुख नितीन बनसोडे, हरुण मोमीन, कोषाध्यक्ष अरुण कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष लिंबराज पन्हाळकर, जिल्हा उपाध्यक्ष श्रीधर स्वामी, जिल्हा सहसचिव खय्युम शेख, जिल्हा सहसचिव अमोल इंगळे आदी प्रयत्न करत आहेत.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

### अंतराळविश्वात कदमताल

हवामान बदल, नैसर्गिक आपत्ती आणि खाद्यान्न सुरक्षा यासारख्या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी अवकाश संशोधन काळाची गरज ठरत आहे. त्याबाबत चांद्रयान-३ ला चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वीपणे उतरविणे हा भारतासाठी गौरवाचा क्षण होता. या यशासह भारत अवकाश संशोधन कार्यक्रमात मातब्बर देश म्हणून जगात नावारूपास आला. त्या दिवसाला आता राष्ट्रीय अवकाश दिवस म्हणून जाहीर करण्यात आले आहे. एकप्रकारे अवकाश संशोधनाने अनेक नावीण्यपूर्ण तंत्रज्ञानाचा विकास करण्याची संधी आणि सुविधा उपलब्ध करून दिली आहे. उपग्रह दळणवळण, जीपीएस, हवामानाचा अंदाज यासारख्या सुविधा अवकाश संशोधनाची देणगी आहे. अवकाश संशोधनातून मिळणार्या ज्ञानाचा उपयोग आपल्या पृथ्वीवर निर्माण होणार्या अडचणींवर मार्ग काढण्यासाठी होऊ शकतो. अवकाश संशोधनात विविध देश सामूहिकरित्या काम करतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्याला चालना आणि जागतिक समस्यांवर उत्तर शेधण्यास मदत मिळते. गेल्या काही दशकांत भारताने अवकाश संशोधन क्षेत्रात असामान्य कामगिरी केली आहे. भारताचे अवकाश संशोधन १९६२ मध्ये सुरू झाले. थोर शास्त्रज्ञ विक्रम साराभाई यांच्या पुढाकारातून भारतीय राष्ट्रीय अवकाश संशोधन समितीची स्थापना करण्यात आली. त्यानंतर १५ ऑगस्ट १९६९ मध्ये भारतीय अवकाश संशोधन संस्था (इस्त्रो)ची स्थापना करण्यात आली. 'इस्त्रो'ने भारताच्या अवकाश संशोधन क्षेत्रात व्यापक भूमिका बजावली आहे आणि अवकाश तंत्रज्ञानाला चालना देण्याचे काम केले. १९७२ मध्ये अवकाश विभागाची स्थापना करण्यात आली आणि 'इस्त्रो'ला या विभागाशी जोडण्यात आले. प्रारंभीच्या काळात इस्त्रोने लहान उपग्रह सोडण्यात आणि रॉकेट तंत्रज्ञान विकसित करण्यावर लक्ष केंद्रित केले. कालांतराने इस्त्रोच्या क्षमतेचा विकास आणि विस्तार झाला आणि कठीण मोहिमा देखील यशस्वीरित्या पार पाडल्या. चंद्राच्या पृष्ठभागावर भारताची पहिली मोहीम चांद्रयान होती. २०२३ मध्ये चांद्रयान-३ च्या माध्यमातून चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर सॉफ्ट लँडिंग करणारा भारत हा जगातील चौथा आणि चंद्राच्या दक्षिण ध्रुवीय भागात उतरणारा पहिला देश ठरला. मंगळयान मोहीम देखील भारताचे मोठे यश मानले जाते. अत्यंत कमी बजेटमध्ये मंगळ ग्रहाच्या कक्षेत प्रवेश करून भारतीय शास्त्रज्ञांनी इतिहास घडविला. इस्त्रोने आता सूर्याबाबत महत्त्वाची माहिती गोळा करण्याचा निर्धार केला असून यानुसार आकाशगंगेला अधिक चांगल्या रितीने समजून घेणे महत्त्वाचे राहील. शिवाय इस्त्रोने भारतीय प्रादेशिक शिपिंग उपग्रह प्रणाली (आयआरएनएसएस) विकसित केली असून या माध्यमातून भारत आणि परिसरातील भागांचे अचूक नेव्हिगेशन सेवा मिळत राहते. इस्त्रोने अनेक प्रकारच्या उपग्रहांचे यशस्वीरित्या लॉचिंग केले आहे. यात दळणवळण उपग्रह, पृथ्वी अवलोकन उपग्रह, जलमार्ग दाखविणारे उपग्रह, प्रायोगिक उपग्रह यांचा समावेश आहे. 'इस्त्रो'ने एकाचवेळी अनेक उपग्रह प्रक्षेपित करण्याची क्षमता विकसित केली आहे. या कामगिरीमुळे भारताच्या केवळ प्रक्षेपण खर्चातच कपात झाली नसून भारताच्या अवकाश तंत्रज्ञानाला बुस्ट मिळाला. इस्त्रोने बहुतांशवेळा तंत्रज्ञान स्वदेश रूपातूनच विकसित केले आहे. पीएसएलव्ही रॉकेट अनेक प्रकारचे उपग्रह अवकाशात सोडण्याचे काम अतिशय चोखपणे पार पाडते. जीएसएलव्ही मार्क-३ हे उपग्रहांना अवकाशात सोडण्यासाठी सक्षम मानले जाते. क्रायोजेनिक तंत्रज्ञानात प्राविण्य मिळवत भारताने मोठे यश मिळवले आहे. क्रायोजेनिक तंत्रज्ञानात अत्यंत कमी तापमानात द्रवरूप इंधनाचा वापर केला जातो. रॉकेटच्या क्रायोजेनिक इंजिनमध्ये द्रव हायड्रोजन आणि द्रव ऑक्सिजनसारख्या अत्यंत थंड इंधनाचा वापर केला जातो. क्रायोजेनिक इंजिनच्या माध्यमातून रॉकेटला अधिक शक्ती मिळते आणि त्यामुळे तो वजनदार उपग्रहांना पृथ्वीच्या कक्षेत सहजपणे स्थापन करू शकतो. परिणामी भारताच्या अवकाश संशोधन क्षमतेत वाढ झाली आहे. आता भारत स्वदेश रुपातून वजनदार आणि एकाचवेळी अनेक उपग्रह सोडण्यास सक्षम झाला आहे. इस्त्रोने अलीकडेच सुरू केलेली गगनयान मोहीम महत्त्वाकांक्षी आणि महत्त्वाची मानली जात आहे. त्याचा प्रमुख उद्देश भारतीय अंतराळवीरांना अवकाशात पाठविणे. यासारख्या मोहिमांच्या माध्यमातून भारत अवकाश यान आणि अन्य आवश्यक उपकरणांना स्वदेश रुपातून विकसित करण्यात सक्षम राहील. ही मोहीम अवकाशाचे ज्ञान आणि माहिती गोळा करण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे. मानवासह अवकाश मोहीम ही तंत्रज्ञानाच्या पातळीवर खूपच किचकट काम आहे. यात अनेक आव्हाने असतात. उदाहरणार्थ, अवकाश यानाची रचना, लाइङ्ग सपोर्ट सिस्टिम, सुरक्षा प्रणाली. ही अत्यंत महागडी मोहीम असते आणि त्यात व्यापक प्रमाणात गुंतवणूक करणे गरजेचे असते. या मोहिमेसाठी कुशल शास्त्रज्ञ, इंजिनिअर, अंतराळवीरांची गरज भासते. गगनयान मोहिमेच्या यशानंतर इस्त्रोचे दुसरे ध्येय चंद्रावर मानवी मोहीम राबविण्याची आहे. ही मोहीम चंद्राबाबत आणखी माहिती जाणून घेण्यास महत्त्वाची ठरणार आहे आणि भविष्यात अन्य ग्रहांवरच्या मोहिमेसाठी एक आधार म्हणून सिद्ध होईल. त्याचवेळी इस्त्रो भारताचे स्वत:चे अवकाश स्थानक तयार करण्याच्या दिशेने काम करत आहे. यानुसार २०३५ पर्यंत अवकाश स्थान स्थापन होईल. या स्थानकात एकूण पाच मॉड्यूल असतील आणि पहिले मॉड्यूल २०२८ पासून सुरू होण्याची अपेक्षा आहे. या स्थानकात एकाचवेळी अनेक अंतराळीवर राहू शकतील आणि विविध प्रकारचे शास्त्रीय प्रयोग करू शकतील. या स्थानकाच्या माध्यमातून भारत अवकाशात अंतराळवीरांना दीर्घकाळपर्यंत राहण्याची आणि काम करण्याची क्षमता प्राप्त करेल. अवकाश स्थानक विज्ञानाच्या विविध बाजूंवर सखोल अभ्यास करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून सिद्ध होईल. भविष्यात या स्थानकाचा वापर अंतराळवीरांना प्रशिक्षण देण्यासाठी आणि चंद्र, मंगळसारख्या मोहिमा आखण्यासाठी करता येईल. इस्त्रोने भविष्यात निश्चित केलेले ध्येय हे अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि देशाच्या विकासासाठी महत्त्वाचे आहेत.

# नव्या शैक्षणिक धोरणातील आव्हाने

नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणीसाठी स्पष्ट रोडमॅप प्रदान न केल्याने उच्च शैक्षणिक संस्था, शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतो. नवीन शैक्षणिक धोरणाला २९ जुलै २०२० रोजी केंद्र सरकारने मान्यता दिली व ते २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षात अस्तित्वात आले. या धोरणाचा उद्देश २०३० पर्यंत भारतीय शिक्षण व्यवस्थेत संपूर्ण परिवर्तन घडवून आणण्याचा असल्याने याला एक नवीन दिशा देणारे आणि 'गेमचेंजर' दस्तऐवज म्हणून संबोधले जाते. हे नवीन शैक्षणिक धोरण राबविताना, बरीच आव्हाने समोर येत आहेत. 'मास्टर ऑफ नन' विद्यार्थ्यांना विस्तृत विषयांमध्ये एकाच वेळी अध्ययन करायला मिळणार असले तरी व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य विकासावर अधिक भर दिल्याने, कला आणि सामाजिक विज्ञान या विषयांवर कमी लक्ष दिले जाण्याची शंका येथे स्वाभाविकपणे उपस्थित होते. त्यामुळे असे संकुचित लक्ष विद्यार्थ्यांच्या एकूण बौद्धिक आणि सर्जनशील वाढीस अडथळा आणू शकते. एकाच वेळी विविध विद्याशाखेंच्या विषयांच्या अध्यायनामुळे विद्यार्थी, 'जॅक ऑफ ऑल आणि मास्टर ऑफ नन' होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अभ्यासक्रमाचा दर्जा नवीन शैक्षणिक धोरणात प्रत्येक विद्यार्थ्याला एक मेजर विषय, एक मायनर विषय, एक जेनरिक/ओपन इलेक्टिव्ह विषय, एक व्यवसाय व कौशल्य संबंधित विषय, क्षमता वृद्धिंगत अभ्यासक्रम, भारतीय ज्ञान प्रणाली आणि मूल्यशिक्षण अभ्यासक्रम इत्यादीमधून क्रेडिट्स (गुण) प्राप्त करावे लागणार आहे. त्याचबरोबर इंटर्नशिप/फील्ड प्रोजेक्ट/शिक्षणार्थी/सामुदायिक प्रतिबद्धता आणि प्रमुख विषयाशी संबंधित सेवा, सहअभ्यासक्रम आणि संशोधन प्रकल्प पण अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. एवढे सर्व अभ्यासक्रमात समाविष्ट असल्याने मेजर (मुख्य) विषयातील बराचसा आवश्यक भागच (विषय) अभ्यासक्रमात घेणे शक्य न झाल्याचे असे मत बहुतांशी शिक्षण तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. मेजर विषय हा महत्त्वाचा असूनही त्यातील महत्त्वाचे विषय/भाग मुलांच्या अभ्यासक्रमात न आल्याने अभ्यासक्रमाचा दर्जा घसरल्याचे त्यांनी सांगितले.



तसेच विद्यार्थ्यांना एकाचवेळी एवढ्या विविध उपक्रमांतून क्रेडिट्स (गुण) मिळविणे कितपत सोयीस्कर पडेल किंवा झेपेल या प्रश्नाचे उत्तर काळच ठरवेल. गुणवत्तेवर विपरीत परिणाम नवीन शैक्षणिक धोरणात शिक्षकांच्या प्रशिक्षणावर जोर दिला गेला आहे. सतत व्यावसायिक विकास आणि प्रोत्साहनांसाठी स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वांचा अभाव, वर्गखोल्यांमध्ये दिल्या जाणार्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर विपरित परिणाम करू शकतो. मोठ्या संख्येने असलेल्या शिक्षकांच्या दर्जेदार प्रशिक्षणाची व्यवस्था कमी पडू शकते. प्रादेक्षिक विविधतेकडे दुर्लक्ष देशभरातील शिक्षणाचे प्रमाणीकरण (स्टँडर्डायझेशन) करण्याच्या धोरणाचे उद्दिष्ट प्रादेशिक आणि सांस्कृतिक विविधतेकडे दुर्लक्ष करू शकते. सर्वसामान्य एकच दृष्टिकोन, कदाचित भिन्न राज्ये आणि प्रदेशांतील विद्यार्थ्यांच्या अद्वितीय गरजा आणि आकांक्षा पूर्ण करू शकणार नाही, अशी शंका उपस्थित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. व्यावसायिक शिक्षण मातृभाषेतून शिक्षण प्रक्रियेत कोणतीही संकल्पना मातृभाषेतील समजावून घेणे सुलभ असते व त्यामुळे विद्यार्थ्यांचा आकलनाचा प्रवास सुलभ आणि समृद्ध होतो. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरणात गैर व्यावसायिक शिक्षण व व्यावसायिक शिक्षण हे मातृभाषेतून देण्याचा मानस आहे. यात प्रामुख्याने व्यावसायिक शिक्षण, जसे आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, व्यवस्थापन शाखा इत्यादी मातृभाषेत घेणार्यांची पंचाईत होऊ शकते. आजपर्यंत व्यावसायिक शिक्षण जे इंग्रजी भाषेत शिकवले जाते, ते आता देशातील विविध प्रांतात, त्या त्या मातृभाषेत देण्याचा मानस आहे. विविध व्यावसायिक शाखेतील विषयांचे पुस्तके, अभ्यास साहित्य व संदर्भ ग्रंथ हे इंग्रजीत मुबलक उपलब्ध आहेत. त्यांचे विविध मातृभाषेत भाषांतर करणे हे अवघड काम आहे. कारण विविध विषयांची शब्दावली (टर्मिनॉलॉजी) ही विविध मातृभाषेत सापडणे कठीण जाऊ शकते. तसेच एखाद्या बहुराष्ट्रीय कंपनीत मराठी, पंजाबी, तामिळ, गुजराती व बंगाली इत्यादी भाषांतून शिकलेल्या इंजिनियर्सनी एकत्रित काम करणे किंवा त्यांच्यामध्ये समन्वय होणेही कठीण जाऊ शकते. कारण त्यांनी त्यांचे अभियांत्रिकी शाखेचे शिक्षण आपापल्या मातृभाषेतून घेतलेले असेल. तसेच मातृभाषेतून व्यावसायिक शिक्षण घेणार्या विद्यार्थ्याला परदेशात कितपत संधी मिळेल हीसुद्धा शंका आहे. त्यामुळे काही शिक्षण तज्ज्ञांच्या मते, बारावीपर्यंत शिक्षण मातृभाषेत मिळावे, परंतु नंतर व्यावसायिक शिक्षण हे इंग्रजीतूनच असावे. अर्धवट शिक्षण पदवीचा कालावधी तीन वर्षांवरून चार वर्षांपर्यंत वाढवला आहे. जरी एक वर्षानंतर सर्टिफिकेट, दोन वर्षानंतर डिप्लोमा देणार आहे, तरी तीन ऐवजी चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम काही विद्यार्थी अर्धवट सोडण्याचा धोका आहे. मूल्यांकन करणे अशक्य विद्यार्थी हा शैक्षणिक प्रक्रियेचा केंद्रबिंदू आहे. नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थांच्या प्रगतीचे सतत मूल्यांकन करण्यावर भर दिला आहे. निश्चितपणेच मूल्यमापन हा अध्ययन-अध्यापन पद्धतीचा एक भाग असून अध्ययनाच्या विविध टप्प्यांवर मूल्यमापन व्हावे आणि अध्यापकांद्वारे विद्यार्थ्यांची प्रगती पडताळावी, हे अपेक्षित आहे. उच्च शिक्षणावरील अखिल भारतीय सर्वेक्षणानुसार (२०२१-२०२२) भारतात उच्च शिक्षणात ४.३३ कोटी विद्यार्थांची नोंदणी झाली आहे. एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थी उच्च शिक्षणात असल्याने, प्रत्येक वर्गात १००च्या वर विद्यार्थी असतात. भारतात एवढ्या मोठ्या प्रमाणावर असणारी विद्यार्थी संख्या व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचार्यांची रिक्त पदे, त्यामुळे विद्यार्थ्यांचे सतत मूल्यांकन करणे कितपत व्यावहारिक व शक्य आहे, हे तपासणे जरुरीचे आहे. अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होणे कठीण उच्च शिक्षणात आता टू सेमिस्टर पद्धती सूरू झाली आहे. त्यामुळे महाविद्यालयात वर्षातील जवळपास सहा महिनात परीक्षा सुरू असतात. प्रत्येक शैक्षणिक सत्रात, अभ्यासक्रम पूर्ण होणे कठीण होत आहे. विद्यार्थांचे अध्यापन घाईघाईतच होत आहे. त्याचबरोबर विद्यार्थांना अभ्यासेतर क्रियाकलापांमध्ये भाग घेणे अवघड जात आहे. त्यामुळे सेमिस्टर पद्धतीबाबत पुनर्विचार होणे आवश्यक ठरते. विद्यापीठांना धोका नवीन शैक्षणिक धोरणात विदेशी विद्यापीठे व संस्थांना भारतात कॅम्पस, केंद्रे स्थापन करण्याची परवानगी मिळणार असून हे धोरण आंतरराष्ट्रीय सहकार्याला चालना देणारे आहे. विद्यार्थ्यांसाठी जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय एक्सपोजर हा यामागचा उद्देश. विदेशी विद्यापीठांचा दर्जा व त्यांच्याकडे असणार्या मुबलक निधीमुळे आपले विद्यार्थी तेथे आकर्षित होण्याची शक्यता आहे व त्यामुळे आपल्या सार्वजनिक विद्यापीठांच्या अस्तित्वाला धोका निर्माण होऊ शकतो. परदेशी विद्यापीठांच्या कॅम्पसमधील शैक्षणिक शुल्क भारतातील किती विद्यार्थ्यांना परवडणारे असेल? दर्जेदार शिक्षण फक्त श्रीमंतांसाठी अशी व्यवस्था निर्माण होऊन शैक्षणिक दरी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांचा, वृद्धांचा निवारा

मोहोळ तालुक्यातील मोरवंची येथे अनु आणि प्रसाद मोहिते यांच्या 'प्रार्थना फाउंडेशन'तर्फे चालविलेल्या निवासी प्रकल्पामध्ये आत्महत्याग्रस्त कुटुंबांमधील निराधार तसेच वृद्धांचा आपुलकीने सांभाळ केला जातो. स्वत:वर आलेल्या संकटाने खचून जायचे की त्यावर मात करत इतरांनाही आधार देण्यासाठी हात पुढे करायचा हे ज्याच्या त्याच्या मनोबलावर ठरते. सोलापूर जिल्ह्यातील अनु मोहिते आणि प्रसाद मोहिते यांनी दुसरा पर्याय स्वीकारला. त्यातून साकारले आहे मोहोळ तालुक्यातील 'प्रार्थना फाउंडेशन'चे 'बालग्राम'. अनु आणि प्रसाद हे दाम्पत्य आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना आधार देण्याचा प्रयत्न करत वाटचाल करत आहेत. त्यासाठी समाजाची मदत मिळतच आहे, पण ती पुरेशी नाही. हे सेवाकार्य पुढे सुरू ठेवण्यासाठी या संस्थेला सढळ हाताने मदतीची गरज आहे.

लापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यात मोरवंची येथे अनु आणि प्रसाद मोहिते या तरुण दाम्पत्याने 'प्रार्थना फाउंडेशन'च्या माध्यमातून आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील निराधार, त्यावरची बेघर मुले आणि अनाथ बालके तसेच वृद्धांना आधार दिला आहे. गेली दहा वर्षे सुरू असलेल्या या समाजसेवेची पार्श्वभूमी तशीच रोमांचकारी आणि प्रेरणादायी आहे. या सेवाव्रताला समाजाचा आधार हवा आहे.



एमएसडब्ल्यू समाजकार्याची शैक्षणिक पदवी घेतलेल्या अनु आणि प्रसाद यांची समाजकार्यात सक्रिय असताना एकमेकांशी ओळख झाली. प्रसाद विठ्ठल मोहिते हा बार्शी तालुक्यातील वैरागजवळील इर्लेवाडी या छोट्याशा गावातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुलगा. तर अनंतम्मा कृष्णया तिरकमान म्हणजेच अनु ही सोलापूरच्या सोमवार पेठेतील सामान्य कुटुंबातील एका मिल कामगाराची मुलगी. सामाजिक जाणिवेतून समाजकार्याला सुरुवात केल्यानंतर त्याचसाठी सर्व आयुष्य व्यथित करायचे अशी शपथ घेऊन त्यांनी सामूहिक विवाह सोहळ्यात आंतरजातीय विवाह केला. लग्नातच अवयवदान आणि देहदानाचा संकल्प करून त्यांनी एक सामाजिक संदेशही दिला.

आतापर्यंतच्या आयुष्यात दाहक अनुभवाने संवेदनक्षम बनलेल्या या समविचारी दाम्पत्याने अनाथ, फुटपाथवर भिक्षा मागणाऱ्या दहा मुलांना 'वंचितांची शाळा-एक पाऊल प्रगतीकडे' या प्रकल्पाला सुरुवात केली. या माध्यमातून वंचित आणि शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणताना अनु आणि प्रसाद दोघेही नोकरी करीत होते. परंतु नोकरीमुळे वेळेचे गणित जुळेना. मग प्रसादने ऑटोरिक्षा घेतली. ती चालवून पैसे आणि हवा तसा वेळ मिळू लागला. अनुने उदरनिर्वाहासाठी मेस सुरू करण्याचा पर्याय निवडला. याचदरम्यान, काळाने त्यांच्या बाळावर घाला घातला. या कठीण परिस्थितीतही धीर धरत तान्ह्या बाळाचे देहदान करून त्यांनी आणखी एक आदर्श घालून दिला.

आपल्या दिवंगत बाळाच्या स्मरणार्थ अनु आणि प्रसाद यांनी 'प्रार्थना फाउंडेशन'ची स्थापना केली. या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविले जाऊ लागले. भिक्षामुक्ती अभियानाच्या माध्यमातून 'मुलांना भीक देऊन दुर्बल बनवण्यापेक्षा, शिक्षण देऊन स्वावलंबी बनवा!' असा संदेश देत समाजात जनजागृती केली जाऊ लागली. दुसरीकडे तरुणांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी 'कृतिशील तरुणाई शिबीर' राबविण्यात येऊ लागले. अशा निवासी शिबिरात राज्यभरातून समाजभान जपणारी तरुणाई सहभागी होते. त्यामध्ये विविध सामाजिक समस्यांवर चर्चा होतात, सामाजिक क्षेत्रात योगदान देणारे कार्यकर्ते मुलांना मार्गदर्शन करतात आणि त्यांना स्वत:ची ओळख निर्माण करून देतात. ही मुले त्यानंतर आपापल्या भागातील समस्या सोडवण्याचा प्रयत्न करतात.

अशा उपक्रमासाठी तसेच रस्त्यावरील बेघर आणि अनाथ मुले-मुली तसेच वृद्ध आजी-आजोबांसाठी 'प्रार्थना बालग्राम' हा निवासी प्रकल्प हक्काच्या जागेत असणे अधिक श्रेयस्कर म्हणून प्रसाद मोहिते यांनी तसा संकल्प केला. या कामी त्याच्या विधवा आईने आपली पाच एकर जमीन, सोने दिले. 'प्रार्थना बालग्राम'चे भूमिपूजन करायला पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे आणि डॉ. स्मिता कोल्हे यांनी आनंदाने होकार दिला. मोहिते दाम्पत्याची धडपड, चिकाटी आणि समाजसेवेचा ध्यास पाहून निवासी प्रकल्पाच्या बांधकामाला मदत करण्यासाठी समाजातून अनेक हात पुढे आले.


करोना संकटावर मात करोना महासाथीमुळे बालग्राम प्रकल्पातील दैनंदिन जीवनचक्र थांबले. येथील अनाथ मुलांवर, निराधार वृद्धांवर अक्षरश: उपासमारीची वेळ आली. या कठीण काळात अनाथ मुले, निराधार वृद्धांना जगवण्यासाठी काही ना काही उपाय करणे गरजेचे होते. निवासी प्रकल्प उभारण्यासाठी समाजातून आलेली मदत तसेच पुरस्कारातून मिळालेली रक्कम खर्च करून या संकटाला तोंड देण्याचा प्रयत्न केला. केवळ अनाथ मुले, निराधार वृद्धांच्या पालनपोषणाचा प्रश्न नव्हता. तर मुलांचे पालक, परिसरातील गरीब कुटुंबेही जगवायची होती. करोनाकाळात ३० हजार लोकांना अन्नदान, तीन हजार कुटुंबांना अन्नाची पाकिटे आणि शेकडो व्यक्तींना मुखपट्ट्या, सॅनिटायझर पोहोचवले गेले. हे सर्व स्वत:ची एक वर्षाची तान्हुली आणि प्रकल्पातील मुलांना सांभाळत सुरू होते. दररोज पहाटे उठून स्वयंपाकाची तयारी करणे, बाळाला घरी निजवून जेवण वाटप करण्यासाठी पायपीट करणे, अशा अथक परिश्रमातून अनु मोहिते यांनी सेवा बजावली. या भयावह महासंकटातून बाहेर पडत हळूहळू समाजजीवन सुरळीत झाल्यानंतर 'प्रार्थना फाउंडेशन' पुन्हा जोमाने कामाला लागले.

वृद्धांच्या नातेवाईकांचे कटू अनुभव सध्या शेतकरी आत्महत्याग्रस्त अनाथ, वंचित, निराधार, रस्त्यावर भिक्षा मागणाऱ्या, एक पालक असलेल्या मुला-मुलींसाठी प्रार्थना 'बालग्राम' निवासी प्रकल्प कार्यरत आहे. या प्रकल्पात ४५ मुले-मुली असून त्यांचे शिक्षण व संगोपन संस्थेत होत आहे. याशिवाय अनाथ, बेघर, बेवारस वृद्धांना आधार मिळावा म्हणून मोफत स्वरूपात वृद्धाश्रम चालविले जातात. या वृद्धाश्रमात सध्या २३ वृद्धांना आधार दिला जात आहे. बहुसंख्य निराधार वृद्ध सधन कुटुंबातील कर्तबगार व्यक्ती आहेत. शेतीवाडी, व्यापार, नोकरी करून मुलांना घडविलेल्या या वृद्धांची आयुष्याच्या संध्याकाळी वाताहत होऊन त्यांना रस्त्यावर पडावे लागले. ते आता फाउंडेशनच्या वृद्धाश्रमात शांतपणे जीवन व्यतीत करीत आहेत. त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याची काळजी घेताना विविध उपक्रम राबविले जातात. वृद्धाश्रमात कोणाचा मृत्यू झाल्यास त्याची माहिती त्यांच्या जवळच्या नातेवाईकांना कळविली जाते. संवेदना बोथट झालेला कोणी वारसदार माहिती कळवूनसुद्धा न आल्यास मृताचा अंत्यविधी संस्था करते.

मुलांच्या भविष्यासाठी धडपड रस्त्यावर, चौकात सिग्नलवर भिक्षा मागणाऱ्या सुमारे अडीचशे मुलांसाठी संस्था काम करीत आहे. त्यांना चांगले शिक्षण देणे आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. वस्त्यांमध्ये राहणाऱ्या महिला व मुलींसाठी मासिक पाळीवर समुपदेशन करण्यासह आरोग्य शिबिरेही आयोजिली जातात. येथील मुले काही अंतरावरील दुसऱ्या शाळेत जातात. त्यांच्यासाठी स्वतंत्र शाळा उभी करायची आहे. त्या दृष्टीने इमारत बांधकामासह स्वतंत्र स्वयंपाकगृह, भोजन कक्ष आदी सुविधा निर्माण करावयाच्या आहेत. त्यासाठी सढळ मदतीची अत्यावश्यकता आहे. त्याशिवाय संस्थेला स्कूल बस आणि रुग्णवाहिकेचीही गरज आहे. शाळेची इमारत, स्वतंत्र स्वयंपाकगृह, भोजन कक्ष याबरोबरच रुग्णवाहिका, स्कूल बस या सुविधांसाठी मोठा खर्च अपेक्षित आहे.

# हवेतील जंतू पसरवत आहेत का साथीचे रोग?

जमिनीवर जीवजंतूंचे अस्तित्व असते याची जाणीव प्रत्येकालाच आहे. परंतु, आकाशातही असेच जीवजंतू आहेत, असे म्हटल्यास कदाचित लोकांचा विश्वास बसणार नाही. मात्र, हे खरे आहे. १९२० च्या दशकात शास्त्रज्ञांनी संपूर्ण अमेरिकेमध्ये विमाने उडवून हवेत तरंगणारे बीजाणू पकडले होते. त्याला आज अनेक वर्षे झाली आहेत. नुकतंच केलेल्या संशोधनात आकाशात अनेक अशा गोष्टी आढळून आल्या आहेत; ज्याने संशोधकही चिंतेत आहेत. सोमवारी संशोधकांनी नोंदवले की, त्यांना तब्बल १० हजार फूट उंचीवर, शेकडो विविध प्रकारचे जीवाणू आणि बुरशीचे नमुने मिळवले आहेत. मुख्य म्हणजे, यातील बहुतेक प्रजातीचे जीवाणू लोकांमध्ये रोग निर्माण करण्यास सक्षम असू शकतात. संशोधकांना नक्की काय आढळून आले आणि याचा परिणाम काय होईल? याविषयी जाणून घेऊ. बार्सिलोना इन्स्टिट्यूट फॉर ग्लोबल हेल्थचे संगणकीय पर्यावरणशास्त्रज्ञ झेवियर रोडो म्हणाले, आकाशात आढळून आलेले एक तृतीयांश जीवाणू आणि बुरशी हे माणसांसाठी रोगजनक ठरू शकतात. रोडो यांनी चेतावणी दिली की, नवीन अभ्यासाने कोणतेही थेट पुरावे दिले नसले तरी आकाशातील सूक्ष्मजंतू जमिनीवर पडल्यास माणसांमध्ये पसरू शकतात. वार्यामुळे रोग पसरू शकतात, त्यामुळे याकडे लक्ष देणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. कावासाकी रोग आणि हवाईजंतूंचा संबंध कावासाकी रोग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आजारात ताप, पुरळ आणि कधीकधी प्राणघातक हृदयविकाराचा झटका येतो. हा आजार नक्की कशामुळे होतो, याविषयी संशोधकांमध्येच मतभेद राहिले आहेत. दोषपूर्ण रोगप्रतिकारक शक्तीमुळे हा आजार होत असल्याचे अनेकांचे सांगणे आहे. कावासाकी रोगाची प्रकरणे मोठ्या प्रमाणात आढळून येतात. रोडो आणि त्यांच्या सहकाऱ्यांना असे आढळून आले की, जपानमध्ये ईशान्य चीनमधून वारे वाहून आले तेव्हा रुग्णांच्या संख्येत वाढ झाली. तेच वारे जेव्हा कॅलिफोर्नियापर्यंत पोहोचले, तेव्हा तिथेही रुग्णसंख्या वाढली. वारे यासाठी कारणीभूत असू शकतात अशी अपेक्षा आम्ही केली नव्हती, माझ्यासाठी हा संबंध खरोखरच धक्कादायक होता, असे रोडो म्हणाले. कावासाकी रोग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आजारात ताप, पुरळ आणि कधीकधी प्राणघातक हृदयविकाराचा झटका येतो. चीनच्या ज्या प्रदेशातून वारे येत होते तिथे अनेक खुल्या खड्ड्यांच्या खाणींसह शेत आणि पशुधन आहेत. संशोधनात या वार्यांमध्ये काहीतरी जिवंत असल्याचे संकेत दिले, त्यामुळे मी विचार केला की त्या ठिकाणी प्रत्यक्षात जाऊन पाहायचे आणि वार्यांचा पाठलाग करायचा, असे रोडो म्हणाले. त्यांच्या टीमने सेसना विमान चीनमधून वाहू लागलेल्या हवेच्या दिशेने उडवले. विमानाच्या बाजूला त्यांनी एक इनलेट उघडला; ज्यामुळे हवा एका ट्यूबमध्ये वाहू लागली आणि हवेतील कण तिथे अडकले. १० हजार फूट उंचीवर १० वेळा उड्डाण केल्यानंतर संशोधकांनी नमुने गोळा केले. त्यानंतर संशोधकांनी नमुने त्यांच्या प्रयोगशाळेत नेले. तिथे त्यांना जैवसुरक्षा सूटमध्ये ठेवण्यात आले, जेणेकरून हे जीवाणू पसरू नये. अभ्यासातील महत्त्वाचे निष्कर्ष कोणते? रोडो आणि त्यांच्या सहकाऱ्यांना हवेतील कणात हाफनियम नावाच्या दुर्मीळ खनिजाची उच्च पातळी आढळली, जी बहुधा चीनमधील खाणींमधून आली होती. नमुन्यांमध्ये बुरशीचे बीजाणूदेखील होते, तसेच सूक्ष्म धूलिकणांना चिकटलेले जीवाणूदेखील होते. दीर्घ प्रवास केल्यानंतरही त्यातील काही जीवाणू जिवंत होते. हेच ते जीवाणू आहेत, जे माणसा-



माणसांमध्ये पसरू शकतात. जेव्हा रोडो आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सूक्ष्मजंतूंमधून डीएनए काढला, तेव्हा त्यांना कमीतकमी २६६ प्रकारच्या बुरशी आणि ३०५ प्रकारचे जीवाणू सापडले. अनेक सूक्ष्मजंतू वनस्पतींवर किंवा मातीत वाढणाऱ्या गटांशी संबंधित होत्या. काही विशेषत: प्रदूषित मातीत वाढणार्या होत्या, तर इतर आपल्या शरीरात राहण्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या गटांशी संबंधित होत्या. रोडो यांनी असा अंदाज लावला की, वायव्य चीन हा रोगजनकांचा एक शक्तिशाली स्त्रोत असू शकतो. कारण त्या भागात पिकांची आणि पशुधनाची मोठ्या प्रमाणावर शेती केली जाते. हे शक्य आहे की, मातीतील काही सूक्ष्मजंतू किंवा अगदी खत किंवा सांडपाणी रोगास कारणीभूत ठरू शकतात. व्हर्जिनिया टेकचे एरोबायोलॉजिस्ट डेव्हिड श्माले म्हणाले की, रोग निर्माण करणाऱ्या जंतूंचा संबंध संशोधनातील जिवंत जंतूंशी असू शकतो. त्यांचे खरे स्वरूप शोधण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे, मानवी पेशी किंवा प्रयोगशाळेतील प्राण्यांना संक्रमित करून संशोधन करणे. पुढील संशोधनाला वाव रोडो म्हणाले की, ते आणि त्यांचे सहकारी मानवी फुफ्फुसाच्या पेशींमध्ये हवेचे नमुने शोधून काढण्यासाठी प्रयोग तयार करत होते. नवीन अभ्यास कावासाकी रोगाचे गूढ शोधू शकले नसल्याचेही त्यांनी सांगितले. ते म्हणाल, हे शक्य आहे की रोगास एकापेक्षा जास्त रोगजनक चालना देऊ शकतात. हेदेखील शक्य आहे की, मुले केवळ त्याच वाऱ्यामध्ये किंवा वायू प्रदूषणामध्ये श्वास घेत असतील. नक्की काय चालले आहे, याची माहिती अद्याप आम्हालाही नाही. ते आणि त्यांचे सहकारी आता जपानमधील त्यांच्या नमुन्यांचे विश्लेषण करण्यासाठी नवीन तंत्रज्ञान वापरत आहेत आणि विषाणूंसह अतिरिक्त जीवांचे पुरावे शोधत आहेत. जरी रोडो आणि त्यांच्या सहकाऱ्यांना वाऱ्यातील रोगजनकांचे स्पष्ट पुरावे सापडले, तरीही ते जंतू एका ठिकाणाहून दुसर्या ठिकाणी रोग पसरवू शकतात का, हा एक मोठा प्रश्न असेल. हवेत १० हजारा फुटांवर असणारे रोगजनक अतिशय विरळ असतात. मात्र, एकच किटाणू आरोग्य बिघडवण्यासाठी पुरेसा आहे. हे विषाणू खूपचं विरळ असतात. आम्हाला त्यांचा अधिक अभ्यास करण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

## पोटभर जेवल्यानंतर लगेच झोपू नका! पाठदुखी टाळण्यासाठी सदगुरुनी दिला सल्ला, जाणून घ्या, तज्ज्ञ काय सांगतात?

सद्गुरु जग्गी वासुदेव यांच्या म्हणण्यानुसार, जर तुम्हाला झोपेतून उठल्या उठल्या पाठदुखी होत असेल तर त्याचे कारण जेवल्यानंतर लगेच झोपणे हे असू शकते. तुम्ही उठता तेव्हा पाठदुखी होण्याचे एक कारण म्हणजे तुम्ही पोट भरून जेवता आणि लगेच झोपता. तुमचे पोट भरलेले असताना तुम्ही जाऊन सरळ झोपता, त्यामुळे मणक्यावर दाब पडतो आणि ते अनेक अवयवांना कार्य करू देत नाही, असे सद्गुरु यांनी सांगितले. इन्स्टाग्राम व्हिडीओमध्ये सूर्यास्तापूर्वी खाण्याच्या पारंपरिक पद्धतीचे कौतुक करताना सद्गुरु म्हणाले, पाठदुखीची इतरही कारणे आहेत, पण झोपण्यापूर्वी किमान तीन ते चार तास आधी जेवण करावे, त्यामुळे पाठदुखी होणार नाही. पाठदुखी टाळण्यासाठी सद्गुरुंनी दिलेल्या या सल्ल्याबाबत तज्ज्ञ काय सांगतात, याबाबत इंडियन एक्स्प्रेसने



जाणून घेतले आहे. खरचं पोटभर जेवून लगेच झोपल्यास पाठदुखी होऊ शकते का? पाठदुखीची विविध कारणे असू शकतात. जसे की, काहीतरी जड उचलणे, पाठीवर पडणे ज्यामुळे दुखापत होते, व्यायामाचा अभाव, चुकीच्या पद्धतीने बसणे आणि वाकणे. पाठदुखी आणि पोटभर झोपणे यांच्यातील परस्परसंबंध दर्शवण्यासाठी पुरेसे वैज्ञानिक संशोधन किंवा पुरावे नाहीत. जर तुमची पाठदुखी एक किंवा दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ टिकत असेल तर सल्लागार तज्ज्ञ अशा परिस्थितीमध्ये मदत करू शकतात. प्रभावी उपचार योजनेसाठी तुमच्या पाठदुखीचे मूळ कारण समजून घेणे महत्त्वाचे आहे, असे दिल्लीच्या अपोलो स्पेक्ट्रामध्ये कार्यरत गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. प्रिती जैन यांनी सांगितले. पण, डॉ. जैन पुढे म्हणाल्या की, रात्रीच्या जेवणानंतर लगेच झोप लागणे ही एक अस्वास्थ्यकर सवय असू शकते, ज्याला आपल्या आरोग्यासाठी बदलावी लागेल; या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करू नये. जेवल्यानंतर लगेच झोपल्याने आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो, यामुळे पोटातील अन्न अन्ननलिकेमध्ये वरच्या दिशेने जाऊ शकते, ज्यामुळे छातीत जळजळ, अपचन, बद्धकोष्ठता आणि गॅस्ट्रोएसोफेजल रिफ्लेक्स रोग सारख्या समस्या उद्भवू शकतात. जेवल्यानंतर लगेच झोपल्यास आरोग्यावर काय होतो परिणाम डॉ. जैन म्हणाल्या की, एखाद्या व्यक्तीला अचानक वजन वाढण्याचा अनुभवदेखील येऊ शकतो. या सवयीचे सतत पालन केल्याने तुमच्या झोपेवरही परिणाम होऊ शकतो. यामुळे निद्रानाश, पॅरासोम्निया, स्लीप एपनिया आणि स्लीपवॉकिंगसारखे झोपेचे विकार होऊ शकतात, असे डॉ. जैन यांनी स्पष्ट केले. पचनास मदत करण्यासाठी झोपेच्या २ ते ३ तास आधी खाण्याचा प्रयत्न करा. जेवणानंतर लांब फिरायला जाण्यासारख्या आरोग्यदायी सवयींमध्ये गुंतल्याने गतिशीलता सुनिश्चित होऊ शकते आणि पोट फुगणे आणि गॅससारख्या समस्यांची शक्यता कमी होते, असे डॉ. जैन यांनी सांगितले.

## ताप आलाय? मग 'हा' घरगुती उपाय ठरेल जादुई; रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यास होईल मदत

सध्या हवामानात सतत बदल होत असल्यामुळे ताप, सर्दी, खोकला यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. रात्री अचानक ताप आल्यावर आपल्यातील अनेक जण 'थंड पट्ट्या' डोक्यावर ठेवतात. आपल्यातील बरेच जण वर्षानुवर्षे हा उपाय करत आले आहेत. पण, आज ताप कमी करण्यासाठी आम्ही यासारखाच पण, थोडा ट्विस्ट असणारा एक उपाय घेऊन आलो आहोत. त्या उपायाचे नाव आहे 'ओले मोजे' . ही पद्धत इन्स्टाग्रामवर एका कन्टेन्ट क्रिएटरने सांगितली आहे.




कन्टेन्ट क्रिएटरच्या मते, ताप आल्यावर मुलांना थंड, ओले मोजे घालायला लावणे आणि नंतर कोरडे, लोकरीचे मोजे घालणे ही कृती ताप कमी करण्यास मदत करू शकते. थंड मोजे रक्ताभिसरणाला चालना देतात, रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात. तुमच्या शरीरातील तापाच्या उष्णतेमुळे थंड मोजे गरम होतात. त्याद्वारे शरीरातील रक्तप्रवाह चांगल्या प्रमाणात वाढतो आणि नैसर्गिकरीत्या ताप कमी होण्यास मदत मिळते, असे त्या कन्टेन्ट क्रिएटरचे म्हणणे आहे.त्याचबरोबर या पोस्टमध्ये लिहिण्यात आले होते की, हा उपाय सुरक्षितरीत्या नैसर्गिक ताप कमी करून, रोगप्रतिकारासाठी शरीराचा प्रतिसाद अन् रक्ताभिसरण वाढवतो. त्यामुळे आजारपणात चांगली झोप येण्यास मदत होते. तसेच हा उपाय केल्यावर इतर औषधोपचारांची गरज भासत नाही, असेदेखील त्यांनी नमूद केले आहे. त्याचप्रमाणे 'वैज्ञानिक आधार' अभ्यास हे सुचवतो की, हायड्रोथेरपी ही रक्तप्रवाह सुधारून आणि रोगप्रतिकार शक्ती वाढवून ताप नियंत्रित करू शकते. ही निसर्गोपचाराच्या तत्त्वांमध्ये रुजलेली एक पद्धत आहे, जी शरीराच्या नैसर्गिक उपचार प्रक्रियेस समर्थन देते. त्यात असेही नमूद करण्यात आले आहे की, तापाच्या औषधांप्रमाणे, हा उपाय नैसर्गिक आहे आणि त्याचे शरीरावर कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत. ही पद्धत फार्मास्युटिकल्सवर अवलंबून न राहता, आजारपणाचे व्यवस्थापन करण्यासाठी शरीराला प्रोत्साहन देते. तसेच ही पद्धत करताना तुम्ही पाण्यात लिंबू, आले, हर्बल टी सुद्धा घालू शकता. जर मुलाचे वय एक वर्षापेक्षा जास्त असेल, तर तुम्ही पाण्यात मध सुद्धा घालू शकता. या उपचार व जुगाडाबद्दल विचारले जाणारे प्रश्न पुढीलप्रमाणे

प्रश्न – लहानांपासून ते अगदी मोठ्यांपर्यंत आपण ओल्या मोज्यांच्या या जुगाडाचा उपयोग आपण करू शकतो का? उत्तर – हो. हा उपाय सगळ्यांसाठी बेस्ट ठरेल. प्रश्न – मी किती वेळा ओले मोजे उपचार म्हणून वापरू शकतो? उत्तर – ताप कमी होईपर्यंत हा उपाय केला जाऊ शकतो. प्रश्न – ओले मोजे घातल्यावर लोकरीचे मोजे वापरणे आवश्यक आहे का? उत्तर – होय, लोकरीचे मोजे उबदारपणा टिकवून ठेवण्यास आणि उपचारांची प्रभावीता वाढवण्यास मदत करतात. तर याबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी दी इंडियन एक्स्प्रेसने हैदराबादमधील लकडी का पुल, ग्लेनेगल हॉस्पिटल्स येथील एचओडी इंटरनल मेडिसिन, वरिष्ठ सल्लागार फिजिशियन डॉक्टर हरिचरण यांच्याशी संवाद साधला. तेसुद्धा असे म्हणाले की, ओले मोजे वापरण्याची पद्धत हा घरगुती उपाय आहे; जे काही लोक ताप कमी करण्यासाठी वापरतात. या पद्धतीमध्ये कॉटनचे पातळ मोजे थंड पाण्यात भिजवून, नंतर ते पिळून पायांत घातले जातात. त्यानंतर कोरड्या लोकरीचे मोजे ओल्या मोजांवर ठेवले जातात आणि ती व्यक्ती झोपायला जाते. डॉक्टरांचा असा दावा आहे की, हे उपचार ताप कमी करण्यास, रक्ताभिसरण सुधारण्यास आणि शरीराच्या नैसर्गिक उपचार प्रक्रियेस उत्तेजन देऊन रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यास मदत करू शकतात. पण, ताप कमी करण्यासाठी ओले मोजे वापरणे या उपायाला समर्थन देणारे कोणतेही वैज्ञानिक पुरावे नाहीत, असे डॉक्टर हरिचरण यांनी सांगितले. डॉक्टर हरिचरण यांनी नमूद केले की, हा उपचार केल्यावर तुम्हाला थंडीदेखील वाजू शकते; पण त्यामुळे व्यक्तीला आरामसुद्धा वाटू शकतो. पण, हा ताप कमी करण्याचा एकमेव उपाय नाही.ओले मोजे हा घरगुती उपचार तुम्हाला तात्पुरता आराम देऊ शकतात; परंतु ते वैद्यकीय उपचारांची जागा घेऊ शकत नाहीत. त्यामुळे तापाचे बारकाईने निरीक्षण करून, लहान मुलांवर हा उपचार करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## मंकीपॉक्सची भारतात एन्ट्री! गर्भवती महिलांनी काय काळजी घ्यावी? ऐका डॉक्टर काय सांगतात

मंकीपॉक्स आजाराची रुग्णसंख्या वाढत असल्याने जगभरात चिंता व्यक्त केली जात आहे. तर आता भारतातही संशयित मंकीपॉक्स रुग्णाची नोंद झाली आहे. आरोग्य मंत्रालयाने या संदर्भातील माहिती दिली असून या रुग्णाला विलगीकरणात ठेवण्यात आले आहे. आफ्रिकन देशांत एमपॉक्स म्हणजेच मंकीपॉक्सची साथ वाढत असल्याने जागतिक आरोग्य संघटनेने या साथीला जागतिक स्वास्थ्य आणीबाणी घोषित केले आहे. गेल्या तीन वर्षांत दुसऱ्यांदा ही वेळ आली आहे. आफ्रिकेतील बाराहून अधिक देशांत पसरत असलेल्या या साथीवर तातडीने उपाययोजना करण्याची गरज संघटनेने व्यक्त केली आहे. दरम्यान, अशातच गर्भवती महिलांनी काय काळजी घ्यावी, या संदर्भात द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना फरीदाबाद येथील अमृता हॉस्पिटलच्या वरिष्ठ सल्लागार, प्रसूतीतज्ज्ञ आणि स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. श्वेता मेंदिरट्टा यांनी सविस्तर माहिती दिली आहे. डॉ. श्वेता मेंदिरट्टा सांगतात, गर्भवती महिलांनी विशेषतः सावधगिरी बाळगली पाहिजे, कारण गर्भधारणेदरम्यान पॉक्स विषाणू गर्भात संक्रमित होऊ शकतो. आईला विषाणूची लागण झाली असल्यास हे संक्रमण होऊ शकते. गर्भवती महिलांसाठी कोणते धोके आहेत? गर्भवती महिलांना त्यांच्या रोगप्रतिकारक शक्तीतील बदलांमुळे संसर्ग होण्याची शक्यता जास्त असते, असे डॉ. मेंदिरट्टा यांनी सांगितले. हैदराबाद येथील ग्लेनेगल्स हॉस्पिटल्सच्या एमएस जनरल सर्जरी, डीजीओ, डॉ. राणी कोप्पुला यांनी सांगितले की, व्हायरल इन्फेक्शनमुळे ताप, पुरळ येतात. गंभीर आजार : एमपॉक्स हा दुर्मीळ असला आणि तो सहज पसरत नसला, तरी हा व्हायरस गर्भवती महिलेला संक्रमित झाल्यास गंभीर लक्षणे



निर्माण करू शकतात. या लक्षणांमध्ये ताप, त्वचेवर पुरळ आणि सूज येणे याचा समावेश असू शकतो. गंभीर प्रकरणांमध्ये, विषाणूमुळे अंधत्व येऊ शकते. जरी मृत्यू दुर्मीळ असला तरी एमपॉक्सचा प्रसार होत असताना सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. गर्भधारणेतील गुंतागुंत : एमपॉक्सची लागण झाल्यास गर्भपात, मृत जन्म किंवा मुदतपूर्व प्रसूतीची शक्यता असते, असे डॉ. मेंदिरट्टा यांनी नमूद केले. बाळामध्ये संक्रमण : हा विषाणू गर्भधारणेदरम्यान किंवा बाळाच्या जन्मादरम्यान आईकडून बाळाकडे जाऊ शकतो, असे डॉ. मेंदिरट्टा यांनी सांगितले. सावधगिरी बाळगा एमपॉक्स होण्याचा धोका कमी करण्यासाठी, गर्भवती महिलांनी अशी घ्या स्वत:ची काळजी स्वच्छता राखा : आपले हात वारंवार धुवा आणि हात धुतल्याशिवाय चेहऱ्याला स्पर्श करणे टाळा. लोकांशी संपर्क टाळा : आजूबाजूला जास्त लोकांशी संपर्क टाळा. जर तुम्ही एमपॉक्स असलेल्या एखाद्या व्यक्तीच्या आसपास असाल तर मास्क आणि हातमोजे घाला. वैद्यकीय मदत घ्या : जर तुम्हाला ताप, पुरळ किंवा सूजसारखी लक्षणे दिसली तर ताबडतोब तुमच्या डॉक्टरांशी संपर्क साधा. एखादी गर्भवती महिला एमपॉक्सच्या संपर्कात आल्यास किंवा ताप किंवा त्वचेवर पुरळ उठणे यांसारखी लक्षणे आढळल्यास ताबडतोब वैद्यकीय सल्ला घेणे महत्त्वाचे आहे. लवकर निदान संसर्ग व्यवस्थापित करण्यात आणि गुंतागुंत कमी करण्यात मदत करू शकते, असे डॉ. कोप्पुला म्हणाल्या. लसीकरण करा : गर्भधारणेदरम्यान एमपॉक्स लसीकरणाची सुरक्षितता आणि आवश्यकतेबद्दल तुमच्या आरोग्य तज्ज्ञांचा सल्ला घ्या, असे डॉ. मेंदिरट्टा म्हणाले. माहिती मिळवा : एमपॉक्स आणि गर्भधारणेबाबत आरोग्य अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शक माहिती जाणून घ्या आणि उपायांविषयी चर्चा करा.

## पावसाळ्यात टोमॅटो वापरण्यापूर्वी एकदा नव्हे दोनदा करा खात्री, कारण तज्ज्ञांकडून जाणून घ्या.

मान्सूनच्या पावसामुळे आराम मिळू शकतो, परंतु त्यामुळे डेंग्यू, चिकुनगुनिया आणि वरच्या श्वसनमार्गाच्या संसर्गासह अनेक पायाभूत आणि आरोग्यविषयक आव्हाने निर्माण होऊ शकतात. पण, या समस्या इथेच संपत नाहीत; कारण पावसाळ्यात टोमॅटोसारख्या भाज्यांवरही अळीचा प्रादुर्भाव वाढतो. अलीकडे इन्स्टाग्रामवर इवान खन्ना आणि मम यांच्याकडे एका मम्मी ब्लॉगरने एक व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यामध्ये पांढऱ्या किड्यांचा प्रादुर्भाव झालेला टोमॅटो दिसत आहे. टोमॅटोमध्ये लहान, पांढरे किडे आहेत, कृपया भाज्या कापताना हुशारीने तपासा, असे तिने सांगितले. या दाव्यामध्ये काही तथ्य आहे का, याबाबत तज्ज्ञांचे काय मत आहे, ते जाणून घेऊ या. टोमॅटो हा आपल्या रोजच्या आहारातील भाग आहे. कधी सलाड म्हणून तर कधी भाजीमध्ये आपण टोमॅटो रोज वापरतो. सहसा भाज्या आपण धुवून, स्वच्छ करून मगच वापरतो; पण पावसाळ्यात एवढे करणे पुरेसे नाही. टोमॅटोसारख्या भाज्यांमध्ये अळी असू शकते. अशा वेळी तुम्ही टोमॅटो न तपासता वापरले तर तुमच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो, त्यामुळे टोमॅटो वापरण्यापूर्वी काय विचारात घ्यावे हे तज्ज्ञांकडून जाणून घ्या. पावसाळ्यात टोमटोमध्ये होऊ शकतात अळ्या पावसाळ्यात वाढलेल्या आर्द्रतेमुळे टोमॅटोमध्ये अळ्या होऊ शकतात, जे कीटक आणि जंतांच्या वाढीसाठी एक आदर्श वातावरण तयार करतात, असे हैदराबादच्या ग्लेनेगल हॉस्पिटल्समध्ये वरिष्ठ सल्लागार फिजिशियन आणि अंतर्गत औषध विभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत डॉ. हरिचरण जी यांनी सांगितले. अळ्यांचा प्रादुर्भाव झालेले



टोमॅटो खाल्यास आरोग्याला धोका निर्माण होईल का? डॉ. हरिचरण सांगतात की, टोमॅटोच्या झाडांना प्रभावित करणारी मुख्य समस्या ही टोमॅटोमधील अळी आहे, कारण ही अळी टोमॅटोच्या झाडावर अंडी घालते. जेव्हा अंडी उबतात तेव्हा टोमॅटोमध्ये किडे शिरतात, यामुळे टोमॅटोचे अंतर्गत नुकसान होते. जसे की, टोमॅटो कुजण्यास सुरुवात होते. टोमॅटोला जीवाणू किंवा इतर हानिकारक पदार्थांचा संसर्ग होतो. अळीचा प्रादुर्भाव असलेल्या टोमॅटोचे सेवन केल्यास आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो. टोमॅटो धुण्यामुळे बाहेरील घाण आणि रसायने निघून जाऊ शकतात, तरीही अंतर्गत दूषितता आरोग्यासाठी धोका निर्माण करू शकते.

# नॅशनल आंबेडकराईट हिस्ट्री असोसिएशनच्या राज्याध्यक्ष पदी डॉ. प्रेम हनवते यांची निवड

पुणे :- भारतातील सोळा राज्यांमध्ये कार्यरत असलेली आंबेडकराईट हिस्ट्री असोसिएशन ही देशीतील इतिहास अभ्यासक संशोधकआणि विदयापीठीय प्रोफेसर, प्राध्यापक यांची आंबेडकररी इतिहास संशोधन कार्याला वाहिलेले राष्ट्रीय पातळीवरकार्य करणारी संस्था आहे. या संस्थेचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष पदी डॉ. प्रेम हनवते यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. डॉ. प्रेम हनवते हे आंबेडकरी चळवळीतील एक नामवंत इतिहास संशोधक म्हणून ओळखले जातात.तीस वर्षांपूर्वी त्यांनी लिहिलेल्या शिवरायांचे निष्ठावंत मुस्लिम सैनिक या पुस्तकामुळे त्यांची खरी ओळख निर्माण झाली. स्वामी रामानंद तीर्थ मराठावाडा विदयापीठातून ब्रिटिश कालखंडातील महार सैनिकांचा पराक्रम या विषयावर त्यांनी पीएच. डी. संपादन केली.२०२२साली या प्रबंधावर महारांचा लष्करी इतिहास हे त्यांचे पुस्तक प्रकाशित झाले.आंबेडकरपूर्व काळातील आद्य समाजसुधारक गोपाळ बाबा वलंगकर यांच्या जीवनकार्यावर गोपाळ बाबा वलंगकर -आंबेडकरी चळवळीचे आधारवड या पुस्तकास इतिहास संशोधकांनी पसंती देऊन अनेक ग्रंथ पुरस्कार देखील प्राप्त झाले. गोपाळ बाबा यांच्या दुर्मिळ आणि लुप्त झालेल्या विनंती पत्र लिखाणाचा शोध घेऊन त्यांनी संपादित करून पुनर्प्रकाशन केले. मराठा लाईट इंफॅन्ट्री-मराठा विरांची शौर्य गाथा, महार रजिमेंट आणि डॉ. आंबेडकर, आंबेडकरपूर्व सैनिक भरतीची चळवळ, शिवराम जानबा कांबळे -व्यक्ती आणि कार्य ही संशोधने प्रकाशनाच्या वाटेवर असून आंबेडकरी चळवळीच्या चरित्रकोशाचे तेमुख्य संपादक आहेत. शिवाय गोपाळ बाबा वलंगकर यांचे रावढळ ता. महाड येथे शासनाने स्मारक करावे या साठी त्यांनी पुढाकार घेतला तसेच दरवर्षी वलंगकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ जीवन गौरव पुरस्काराचे आयोजन देखील करतात.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या देश विदेशातील कार्यावर संशोधन करून दुर्मिळ दस्तवेजाचे जतन करणाऱ्या डॉ. आंबेडकर अर्काईव्ह या बार्टीच्या प्रकल्पाचे मुख्य समन्वयक आहेत. महाराष्ट्रासह विविध राज्यातील आणि विदेशातील अनेक इतिहास संशोधकांशी त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. उत्कृष्ट वक्ते असलेल्या डॉ. प्रेम हनवते यांची व्याख्याने अनेक विदयापीठे आणि परिषदा मध्ये आयोजित केली जातात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे येथे नुकत्याच संपन्न झालेल्या डॉ. आंबेडकर अर्काईव्ह च्या संशोधन सल्लगार परिषदेच्या बैठकीत प्रसिद्ध इतिहास संशोधक तथा आंबेडकराईट हिस्ट्री असोसिएशन चे राष्ट्रीय सचिव डॉ. संतोष बनसोड यांनी डॉ. प्रेम हनवते यांच्या निवडीची ही घोषणा केली. यावेळी आंबेडकराईट हिस्ट्री असोसिएशनचे नॅशनल प्रेसिडेंट प्रो. डॉ. संदेश वाघ मुंबई, बार्टीचे महासंचालक सुनील वारे सर यांनी नव नियुक्त राज्याध्यक्ष डॉ. हनवते यांचे शाल व बुके देऊन सत्कार केला. तर याप्रसंगी उपस्थित असलेले प्रसिद्ध लेखक अशोक गोपाल,प्रो. डॉ. प्रशांत बनसोड (गोखले संस्था पुणे )संशोधक व संग्राहक विजय सुरवाडे,)रमेश शिंदे, योगीराज बागुल मुंबई, वृषाली शिंदे आरती जाधव डॉ. संभाजी बिरांजे कोल्हापूर रामदास लोखंडे पुणे यांनी अभिनंदन केले. त्यांच्या या निवडीमुळे राज्यतील सामाजिक चळवळीतील विचारवंत,संशोधक अभ्यासक आणि साहित्य क्षेत्रातील अनेकांनी आनंद व्यक्त केला आहे.





# शारदा इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्याची राज्य स्पर्धेसाठी निवड



लातूर, दि.१३- लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने १४ वर्षीय वयोगट शालेय विभागीयस्तरीय जिम्नॅस्टिक स्पर्धा नुकत्याच नांदेडच्या क्रीडा संकुलावर झाल्या. यात लातूरच्या शारदा इंटरनॅशनल स्कूलच्या १४ वर्षे वयोगटातील मुलांच्या संघाने सहभाग नोंदवला होता. त्यात इयत्ता सहावीच्या प्रज्ञेश सुरवसे याने प्रथम क्रमांक पटकावला. त्याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या यशाबद्दल रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील, उपाध्यक्ष एल. एम. पाटील, संस्थेचे अन्य संचालक, प्राचार्य दत्ता घारगे, उपप्राचार्य विलास गायकवाड, शिक्षिका शीला शेळके, वैशाली गिरवलकर, क्रीडा विभाग प्रमुख विजय जाधव, ज्योती पवार यांच्यासह सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचार्यांनी या खेळाडूचे कौतुक केले आहे.

# ट्वेंटीवन शुगरच्या रोजगार मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद



लातूर : प्रतिनिधी लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात, शेतकरी आणि शेतमजूर यांच्या मुलांच्या हातांना काम मिळवून देऊन ही कुटुंबे आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी, मांजरा परिवारातील साखर कारखाने व बँकांनी पुढाकार घ्यावा, असा सूचना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दिल्या असून, त्याचाच एक भाग म्हणून १२ सप्टेंबर रोजी ट्वेंटीवन शुगर युनिट-१ च्या वतीने आयोजित रोजगार मेळाव्यास तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या तरुणांना प्रशिक्षणासह, आर्थिक व इतर सर्व प्रकारची मदत करुन उद्योजक व व्यावसायिक बनवण्याचा प्रयत्न होणार आहे. शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नसल्याने सध्या ग्रामीण भागात सुशिक्षित तरुणांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे, या तरुणांच्या हाताला काम मिळवून देण्यासाठी त्यांना शेतीपूरक उद्योग, व्यवसायात मदत करण्याचा निर्धार मांजरा परिवाराच्या वतीने करण्यात आला आहे. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या सूचनेवरुन १२ सप्टेंबर रोजी ट्वेंटीवन शुगर युनिट-१ च्या वतीने, कारखाना साईट मळवटी येथे, या तरुणांसाठी रोजगार मेळावा घेण्यात आला, मिळाल्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, हजारोच्या संख्येने या ठिकाणी युवकांनी आपली नोंदणी केली. विविध प्रकारची वाहन चालवणेचे प्रशिक्षण घेतलेले युवक, ऊस तोडणी यंत्रावर काम करण्याची तयारी असलेली युवक, वाहन व इतर मशिनरीची दुरुस्ती करण्याची तयारी असलेल्या युवकांची नोंदणी करून त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे हमी या ठिकाणी देण्यात आली, शेतीसाठी लागणारी इतर अवजारे खरेदी करून त्याचा व्यवसाय करणा-यांसाठीही, ट्वेंटीवन शुगर व बँकांच्या वतीने हमी देण्याची तयारी यावेळी दर्शवण्यात आली, त्यामुळे या हा रोजगार मेळावा, अनेक तरुणांच्या हाताला तातडीने काम देणारा तर ठरलाच शिवाय अनेक तरुणांना उद्योजक आणि व्यावसायिक बनणारा ठरला आहे.

ट्वेंटीवन शुगर युनिट क्रमांक १, मळवटीच्या वतीने आयोजित या रोजगार मेळाव्यास लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, विलास को-ऑपरेटिव बँक तसेच आयसीआयसीआय, एचडीएफसी, सुंदरम, महिंद्रा, एचडीबी, चोलामंडलम, एयुइंडसन, एलअँडटी, व इतर खाजगी फायनान्स कंपन्यांचे प्रतिनिधी, महिंद्रा, स्वराज, हिंदुस्तान, मॅसी, फरगुशन, जॉन डियर, कुबोटा इत्यादी वाहन कंपन्यांचे प्रतिनिधी त्यांच्या वेगवेगळ्या वाहनांसह या मेळाव्यास उपस्थित होते. शिवशक्ती, लक्ष्मण, श्रद्धा, नृसहिं, हिंदुस्तान, लक्ष्मी इत्यादी ट्रॉली व जाळी बनवणा-या कंपन्यांचे प्रतिनिधी ही आपल्या उत्पादन वैशिष्ट्यसह येथे उपस्थित होते, ज्यांना नोकरी पाहिजे त्यांना नोकरी आणि ज्यांना उद्योग व्यवसायिक बनायचे आहे त्यांच्यासाठी कर्जाची हमी या ठिकाणी देण्याचा प्रयत्न झाला त्यामुळे हा रोजगार मिळावा अत्यंत यशस्वी ठरला आहे.

# धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र अॅटोरिक्षा, मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाकडे नोंदणी करण्याचे आवाहन

## लातूर प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत नाव नोंदणी सुरु

लातूर, दि. १३ (जिमाका): राज्य शासनाने धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र अॅटोरिक्षा मिटर्ड टॅक्सी, टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाची स्थापना केलेली आहे. या कल्याणकारी मंडळाकडून केंद्र व राज्य शासनामार्फत व राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ ऑटो रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालकांना देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत याबाबतची नोंदणी प्रक्रिया राबविण्यात येत आहे. जीवन विमा व अपंगत्व विमा योजना, आरोग्य विषयक लाभ, कर्तव्यावर असताना दुखापत झाल्यास अर्थसहाय्य योजना (रु. ५० हजारांपर्यंत), पाल्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना, कामगार कौशल्य वृध्दी योजना, ६५ वर्षावरील अॅटोरिक्षा / मिटर्ड टॅक्सी परवानाधारक यांना निवृत्ती सन्मान योजने अंतर्गत सानुग्रह अनुदान, नविन ऑटो-रिक्षा तथा मिटर्ड टॅक्सी खरेदी, गृह खरेदीसाठी घेण्यात येणारे कर्ज, राज्यस्तरीय मंडळाने वेळोवेळी मान्यता दिलेल्या इतर कल्याणकारी योजना, शासनाने निर्देशित केलेल्या इतर कल्याणकारी योजना, या व्यतिरिक्त शासनाने घोषित केलेल्या अनुषंगिक योजना योजनांचा लाभ या मंडळाकडून दिला जाणार आहे. सर्व योजनेसंबंधीत नियम, अटी व मार्गदर्शक सुचना महाराष्ट्र ऑटो- रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाकडून निर्गमित करण्यात येतील. मंडळाच्या कल्याणकारी योजनेचा लाभ मिळविण्याची चालकांनी जिल्हा कार्यालयामध्ये विहीत नमुन्यात अर्ज सादर करावा. प्रत्येक अर्ज जिल्हास्तरीय समितीकडून त्यांना दिलेल्या निकषानुसार पात्रतेसाठी तपासले जातील. मंजुर लाभ राज्यस्तरीय मंडळाने व जिल्हास्तरीय समितीने वेळोवेळी विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार वितरीत केले जातील. ऑटो-रिक्षा परवानाधारका, ऑटो रिक्षा / मिटर्ड टॅक्सी चालकांनी मंडळाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील परिवहन कार्यालयामार्फत याबाबतची नोंदणी प्रक्रिया राबविण्यात येत आहे. नोंदणीकृत चालकांना लाभ देण्यासाठी मंडळाच्या संबंधित जिल्ह्यातील कार्यालयाकडून ओळखपत्र जारी करण्यात येईल. मंडळाच्या सभासद होण्यासाठी अर्जदाराने महाराष्ट्र राज्यामध्ये नोंदणी असलेल्या ऑटो-रिक्षा / मिटर्ड टॅक्सी अनुज्ञप्ती व बॅज धारण केले असणे बंधनकारक राहील. पात्र अर्जदाराच्या कुटुंबातील व्यक्ती मंडळाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र असतील. तथापि, कुटुंबातील सदस्य संख्या ही चालक, जोडीदार व मुले मिळून ४ पर्यंत मर्यादित असेल. जो सभासद सलग एक वर्षापेक्षा जास्त काळ मंडळाची वर्गणी भरणार नाही. अशा सभासदाचे सभासदत्व सुनावणीची एक संधी देऊन रद्द करण्यात येईल. परवानाधारकास दिव्यांगत्व आले तरी तो परवानाधारक देखील कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र राहील. परवानाधारकाचा मृत्यु झाल्यास त्याची अनुज्ञप्ती त्याच्या कायदेशीर वारसास हस्तांतरित करण्यात येते. मयत परवानाधारकाचा कायदेशीर वारस त्याच्याकडे अनुज्ञप्ती अथवा बॅज नसेल तरी हा कायदेशीर वारस कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र राहील. नोंदणी शुल्क व ओळखपत्र शुल्काची रक्कम ५०० रुपये राहील. ही नोंदणी शुल्क अर्जासोबत जमा करण्यात येईल. तसेच, नोंदणी शुल्क व ओळखपत्र शुल्काची रक्कम राज्यस्तरीय मंडळ यांनी वेळोवेळी निश्चित केल्याप्रमाणे असेल. वार्षिक सभासद शुल्क वार्षिक सभासद शुल्क रक्कम ३०० रुपये राहील.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या महाराष्ट्र भूषण पुरस्कारांचे मंगळवारी मान्यवरांच्या हस्ते वितरण

लातूर: मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई जिल्हा शाखा लातूर आयोजित महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळा-२०२४ येथील दयानंद सभागृहात मंगळवार, दि. १७ सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० वा. आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती लातूर जिल्हा पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अशोक देडे यांनी दिली. पंढरपूर देवस्थानचे कार्याध्यक्ष ह. भ.प.गहिनीनाथ महाराज यांच्या शुभहस्ते व पत्रकार संघाचे संस्थापक संजय भोकरे यांच्या अध्यक्षस्थानी हा सोहळा पार पडणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री दिलीपराव देशमुख, आ. अमित देशमुख, खा. डॉ. शिवाजी काळगे, आ. रमेशआप्पा कराड, पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे ( दिल्ली), प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधिक्षक सोमय मुंडे, मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे, पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे, मराठवाडा अध्यक्ष वैभव स्वामी उपस्थित राहणार आहेत. सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल बाबा आमटे महाराष्ट्र भूषण पुरस्कार, शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल कर्मवीर भाऊराव पाटील महाराष्ट्र भूषण पुरस्कार, राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र भूषण पुरस्कार, क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल खाशाबा जाधव महाराष्ट्र भूषण पुरस्कार, पत्रकारितेमधील उल्लेखने कार्य केल्याबद्दल बाळशास्त्री जांभेकर महाराष्ट्र भूषण पुरस्कार, महिलांमध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सावित्रीबाई फुले महाराष्ट्र भूषण पुरस्कार, उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र भूषण पुरस्कार, प्रशासकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र भूषण पुरस्कार, वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र भूषण पुरस्कार, सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सहकार महर्षी महाराष्ट्र भूषण पुरस्कार मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात येणार आहे. स्मृतिचिन्हे, गौरवपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष अफसर कारभारी, जिल्हा सचिव अशोक हनवते, जिल्हा संघटक सुधाकर फुले, शहर जिल्हाध्यक्ष महादेव डोंबे, इले. जिल्हाप्रमुख नितीन बनसोडे, हरुण मोमीन, कोषाध्यक्ष अरुण कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष लिंबराज पन्हाळकर, जिल्हा उपाध्यक्ष श्रीधर स्वामी, जिल्हा सहसचिव खय्युम शेख, जिल्हा सहसचिव अमोल इंगळे आदी प्रयत्न करत आहेत.

# मुलाच्या 'कार'नाम्यासाठी कोणालाही बोललो नाही!

अकोला : नागपूर हिट अँड रन प्रकरणात भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रेशखर बावनकुळे यांचा मुलगा संकेत बावनकुळे याचा सहभाग असल्याने याप्रकरणाची सध्या चांगलीच चर्चा रंगली आहे. नागपूर पोलिसांनी याप्रकरणाचा तपास आणि इतर कारवाई करताना केलेली दिरंगाई टीकेचा विषय ठरत आहे. संकेत बावनकुळे यांना वाचविण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न होत असल्याचा आरोपही विरोधक करत आहेत. हे सर्व आरोप चंद्रशेखर बावनकुळे यांनी फेटाळून लावले आहेत. मी माझ्या मुलासाठी पोलिसांवर कोणताही दबाव आणत नसल्याचा दावा त्यांनी केला. ते शुक्रवारी अकोल्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होते.



यावेळी चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर हिट अँड रन प्रकरणात सत्ताधारी भाजप पोलिसांवर दबाव आणत असल्याच्या आरोपांचे खंडन केले. त्यांनी म्हटले की, पोलिस चौकशीवर दबाव येणार नाही. मी कधीही पोलिसांना फोन केला नाही, फक्त एकदा माहिती घेतली. काही दिवसांपूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह महाराष्ट्रात आले होते. मी त्यांना सुद्धा या प्रकरणाविषयी काहीही बोललो नाही. पोलिसांनी कोणाचाही मुलगा असो माझा असो सामान्य घरातील, त्याच्यावर कायद्यानुसार कारवाई करावी. फक्त आता एकच प्रश्न उरतो तो म्हणजे गाडी चालवणारा आणि गाडीत बसणा-यांवर कोणते गुन्हे दाखल होणार? पोलिस सध्या त्यादृष्टीने तपास करत असल्याचे चंद्रशेकर बावनकुळे यांनी म्हटले. महायुतीतील ७५ टक्के जागावाटपावर मतैक्य झाल्याचा दावा भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंनी केला. बावनकुळे कालपासून अकोला, वाशिम आणि बुलडाणा या तीन जिल्ह्यांचा तीन दिवस विधानसभानिहाय आढावा घेत आहेत. या जागांवर महायुतीतील तिन्ही पक्षांचे एकमत असल्याचे ते म्हणाले. ज्याचा उमेदवार चांगला त्याला जागा असे सूत्र आहे. कोणताच पक्ष कोणत्या जागेसाठी आग्रह धरणार नसल्याचे ते म्हणाले.

मोदींवर विसंबून राहल्याने फटका भाजपचा गड असलेल्या विदर्भात आमच्याच अतिआत्मविश्वासाने लोकसभेत पराभूत झाल्याचे ते म्हणाले. आम्ही मोदी आहेत याच गोष्टींवर विसंबून राहत जास्त प्रयत्न न केल्याचे बावनकुळे यांनी मान्य केले.

राणेंच्या वक्तव्याचा विपर्यास नितेश राणे यांचे म्हणण्याप्रमाणे या देशातील अनेक भागात मुस्लिम परिवार एकत्र राहतात. बांगलादेशातील घटनेचा आधार घेऊन काही युवा पिढी अमितभाई, मोदीजी, फडणवीसांना कापून टाकू असे व्हिडीओ व्हायरल करत आहे. त्याआधारावर नितेश राणे बोलले आहे, त्यावर आपण विचार केला. हे आपल्याला मान्य नाही. नितेश राणे यांचे वक्तव्य सरळ आहे. हिंदू विरोधी आणि देश विरोधी वागणा-या लोकांच्या आम्ही विरोधातच आहोत.नितेश राणे यांच्या वक्तव्याचा विपर्यास करण्यात आला. देशविरोधी मुस्लिमांकडून काही खरेदी करू नका, असं ते म्हणाल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

मराठा आरक्षणावर बावनकुळे काय म्हणाले? मराठा समाजाला आरक्षण दिले गेले पाहिजे. ज्या ठिकाणी समाज मजबूत नाही तिथे अगोदर दिले पाहिजे. मराठ्यांना आरक्षण देताना ओबीसी आरक्षणाला धक्का लागला नाही पाहिजे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जबाबदारी घेतली आहे. जरांगे आणि मुख्यमंत्री हे एकत्र बसून चर्चा करणार असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

# मुंबई, पुण्यानंतर लातूरात हमाल, मापाड्यांना माथाडी बोर्ड लागू करण्याचे काम केले - माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर

लातूर दि.१३-०९-२०२४ गेल्या दहा वर्षामध्ये महायुती सरकारने राज्याचा आणि देशाचा चौफेर विकास करण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसर्यांदा प्रधानमंत्रीपदी विराजमान होण्याची संधी मिळाली. त्यांच्याच विचारावर लातूर भाजपाची वाटचाल चांगल्या पध्दतीने सुरू आहे. लातूर बाजार समितीच्या सभापतीपदी असताना लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचा चौफेर विकास करण्याचे काम केलेले आहे. शेतकर्यांच्या २०० मुलांसाठी सुसज्ज वसतिगृह, १०० हमाल मापाड्यांसाठी गौरीशंकर गृहनिर्माण संस्थेच्या माध्यमातून घरे देण्याचे काम केले. याबरोबरच हमाल मापाड्यांसाठी हमाल भवन निर्माण करून हमाल मापाड्यांच्या उज्वल भविष्यासाठी मुंबई, पुण्यानंतर लातूरात साडेसहा हजार हमाल गाडीवानांसाठी माथाडी बोर्ड लागू करण्याचे काम केलेले आहे, असे प्रतिपादन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले. यावेळी ते महाराष्ट्र नागरी बँकेच्या सभागृहात आयोजित हमाल, मापाडी, गाडीवान संघटनेच्या विशेष बैठकीत बोलत होते.



यावेळी या बैठकीला व्यापारी संघटनेचे ज्येष्ठ नेते बाबासाहेब कोरे, दिनकर पाटील मसलगेकर, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस निळकंठराव पवार, सुभाषअप्पा सुलगुडले, माजी नगरसेवक अजय दुडिले, नंदकिशोर सोनी, नितीन कोरे, हमाल गाडीवान संघटनेच्या महिला अध्यक्षा ईनुबाई आदमाने, रज्ञाक शेख, भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश सचिव मुन्ना हाश्मि, संजय गिर, अॅड. गणेश गोजमगुंडे, आकाश बजाज, संतोष तिवारी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी १४० कोटी जनतेच्या आशीर्वादावर तिसर्यांदा प्रधानमंत्री पदाची शपथ घेऊन भारतीय राज्यघटनेचा सन्मान करण्याचे काम केले. परंतु खर्या राज्यघटनेला बदलण्याचे काम कॉंग्रेसने केलेले आहे. १९७५ मध्ये इंदिरा गांधीनी आणिबाणी जाहीर करून अनेकांना अटक करण्याचे काम केलेले आहे. यामध्ये जयप्रकाशजी नारायण यांच्यासारख्या राष्ट्रीय नेत्याला व लातूर जिल्ह्यातील अॅड.गोमारे, धनंजय पाटील व कुकडे काका यांनाही अटक झाली होती. यानंतरही जगातील विविध देशाचे युध्द व कोरोना काळातील परिस्थितीवर हिंमतीने मात करीत भारत देशाची चौफेर प्रगती करण्याचे काम देशाचे पंतप्रधान मोदीजींनी केलेले आहे. त्यामुळे जगातील १४ राष्ट्रांनी मोदीजींना सर्वोच्च पुरस्कार देऊन गौरविले. त्यामध्ये सहा मुस्लीम राष्ट्रांचाही समावेश आहे. आताही जगातील ७८ टक्के लोक मोदीजींना पसंती देत आहेत. त्यामुळे त्यांच्या हातून होत असलेल्या प्रगतीमुळे अठराव्या शतकात स्वामी विवेकानंदांनी केलेली भविष्यवाणी खरी ठरून २०३१ मध्ये भारत जगाचे नेतृत्व करेल.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE